0C

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

8.

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.  पहिली खबर क्र. FIR No.: 08  वर्ष Year: 2025  दिनांक Date: 15/02/25 9.

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम  कलमे Sections: 7 A, 12 10.
   (ii) अधिनियम Act: 1988  कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: —

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: शुक्रवार  तारीख पासून Date from: 13/2/25  वेळ Time: 12:42  तारीख पर्यंत Date to: 15/02/25  वेळ Time: 17:20 11.

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.०० 12.
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: 12/02/25  वेळ Time: 13:00

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 05 लेखी  तारीख Date: 15/02/25  वेळ Time: 07:15

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. 13.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: जोसेफ काळे, फर्ग्युसन उद्यान, कुचिकोर्वे नगर, सांताक्रुझ पूर्व.  ठिकाणाचे नंबर No. if any  गल्ली Ward  रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: सावित्रीबाई फुले उद्यान, कुचिकोर्वे नगर, साईबाबा मंदिर जवळ, सांताक्रुझ  गाव Village  पोस्ट Post  तालुका Taluka  जिल्हा Dist.: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station: वाकोला पो.ठा.  तालुका Taluka  जिल्हा Dist.: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: श्री. रोहित सत्यवान कांबळे  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: श्री सत्यवान कांबळे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 06/02/2001  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: 9157221662
   (e) पारपत्र क्रमांक Passport No.: —  दिल्याचा दिनांक Date of issue: —  दिल्याचे ठिकाण Place of Issue: —  (f) व्यवसाय Occupation: —
   (g) धर्म Religion: हिंदू  ज्ञात Caste: मातंग  जनजात Sub-Caste: अ.जा.
   (h) पत्ता Address: कुचिकोर्वे नगर, साईबाबा मंदिर जवळ  गल्ली/सर्व्हे नं. Ward  घर/नाव नं. House Name No.  फोन/मो. नं. Phone No.  पॅन नं. Pan No.  वोटर्स नं. Card No. 14.
   रस्त्याचे नाव Road: वाकोला रोड  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: कमळा टॉवर  गाव Village: सांताक्रुझ पूर्व  पोस्ट Post: मुंबई 29  पो. स्टे. P. Stn.: —
   तालुका Taluka  जिल्हा Dist.: मुंबई शहर  राज्य State: महाराष्ट्र  सध्याचा पत्ता Present Address: 'वरील प्रमाणे'

15.

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) विशाल रमेशचंद्र पांडे वय 30 वर्षे पोलीस नाईक, कांदिवली मु. 67
2) श्री. विजेंद्र रामदास पाटील, वय 35 वर्षे पोलीस नाईक कांदिवली 67
3) अजित अशोक काळे वय 20 वर्षे दिवा पूर्व. जि. ठाणे

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025) 4) इसम (नाव व पत्ता माहित नाही )- मिळून न आलेला.

Scanned with OKEN Scanner

" फिर्याद "

यातील फिर्यादी रोहित सत्यवान कांबळे यांची फिर्याद स्वतंत्र पानावर टंकलिखीत करण्यात आली असुन तीच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणुन समजण्यात यावी.

समक्ष
(यशवंत बोरसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

[signature]

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक. १५/०२/२०२५

श्री. रोहित सत्यवान कांबळे वय २४ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी (मायक्रोसॉफ्ट कंपनी, सी.एस.टी, मुंबई), रहा : कुचिकुर्वे नगर, साईबाबा मंदिराजवळ, तलाव रोड, कलिना टॅक, कलिना, सांताक्रुझ पूर्व, मुंबई २९ मो. क्र. ९१३७२२१६६२

ooooo

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर मी व माझी आजी श्रीम. यमुना मधुकर कांबळे हिच्यासह माझे जन्मापासुन रहावयास आहे. मी मायक्रोसॉफ्ट कंपनी, सी.एस.टी, मुंबई या कंपनीमध्ये पॅन्ट्री बॉय म्हणून नोकरीस असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा व माझे आजीचा उदरनिर्वाह चालतो.

मी व माझी आजी रहात असलेली खोली ही आजीचे नावे असुन कुचिकुर्वे नगर परिसरात सन २०१९ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे पुर्व यांच्या मार्फतीने झोपडपट्टीचा सर्व्हे करण्यात आला होता. सदरच्या काळात कोविड - १९ लॉकडाऊनमुळे तसेच माझे आजीची तब्येत ठिक नसल्याने मी व आजी मुळ गावी पंढरपुर येथे गेलो होतो. आमची खोली सार्वजनिक शौचालयाच्या मागे असल्याने सहजा-सहजी निदर्शनास येत नाही म्हणुन सदर सर्व्हे दरम्यान आमचे खोलीस सर्व्हे नंबर पडलेला नव्हता.

माझी आजी निरक्षर असल्याने तिच्या नावाने मी दिनांक ०३/१०/२०२४ रोजी मा. सक्षम प्राधिकारी - ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पुर्व, मुंबई यांचे कार्यालयात आमचे खोलीचा सर्व्हे होऊन बायोमॅट्रिक करण्यात यावे यासाठी विनंती अर्ज दिलेला होता. ऑक्टोबर २०२४ मध्येच मी माझे अर्जावर काय कारवाई करण्यात आली याबाबत माहिती घेण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पुर्व, मुंबई येथे गेलो व तेथील सर्व्हे संदर्भात काम करणारे परि. भुमापक अधिकारी श्री. विनोद म्हात्रे यांना भेटलो. असता, त्यांनी अभिजीत नावाच्या कर्मचाऱ्यास बोलावुन खोली पाहण्याबाबत सांगितले असता सदर कर्मचारी हे ऑक्टोबर महिन्यात घरी येवुन खोली पाहुन गेले व सदरबाबत वरिष्ठांशी बोलुन खोलीचे सर्वेक्षण करायचे किंवा नाही याबाबत निर्णय घेऊ असे सांगितले. त्यानंतर मी वेळोवेळी श्री. अभिजीत यांचेकडे माझे कामाबाबत फोनवर तसेच समक्ष विचारणा केली असता काम होईल एवढेच ते सांगत होते. आमचे परिसराचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे मार्फतीने पुन्हा सर्वेक्षण होणार अशी नोटीस दिनांक २७/०१/२०२५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे नोटीस जारी करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दिनांक १०/०२/२०२५ पासुन आमचे परिसरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणतर्फे पुन्हा सर्व्हे सुरु झाला. त्यावेळी कर्मचारी श्री. अभिजीत, श्री. उमेश व अधिकारी श्री. म्हात्रे असे माझी खोली बघण्यासाठी पुन्हा आले. त्यावेळी त्यांनी माझी खोली मॅपमध्ये बसत नसल्याचे सांगुन सर्वेक्षणाच्या शेवटच्या दिवशी काय करायचे ते बघु असे त्यांनी सांगितले. दिनांक ११/०२/२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वा. च्या सुमारास कर्मचारी श्री. अभिजीत व श्री. उमेश हे गेट क्र. १, कुंचीकुर्वे नगर येथे भेटले त्यावेळी मी त्यांना माझे खोलीचे सर्वेक्षण करण्याबाबत विनंती केली असता, श्री. उमेश याने मला यासाठी १ लाख रुपये लागतील असे सांगितले. माझी आजी वयोवृद्ध असुन आमची एवढे पैसे देण्याची ऐपत नसल्याचे त्यांना सांगितले असता त्यांनी मला २० हजार रुपये लागतील असे सांगून बेकायदेशीर मार्गाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकरीता लाचेची मागणी केली.

मला श्री. अभिजीत नागले व श्री. उमेश यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द दिनांक. १२/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात येवून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटुन माझी तक्रार सांगितली. त्याप्रमाणे त्यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता तपासी अधिकारी म्हणून पो.नि. यशवंत बोरसे व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून स.पो.आ. चंद्रकांत माळी यांची नेमणुक केली व माझी तक्रार नेमण्यात आलेल्या पंचाच्या सहाय्याने माझे सांगण्यानुसार लिहून घेतली.

समक्ष
(यशवंत बोरसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

मी केलेल्या तक्रारीनुसार दिनांक १२/०२/२०२५ रोजी मी, पोलीस पथक व शासकीय पंच असे गेट क्र. १, कुचीकुर्वे नगर, सांताकुझ, मुंबई येथे जावून पडताळणी केली असता, श्री. अभिजीत व श्री. उमेश यांना त्यांच्या फोन करुन व समक्ष भेटल्यानंतर श्री. अभिजित यांनी श्री. उमेश यांना भेटण्यास सांगितले असता, त्याप्रमाणे मी श्री. उमेश याना भेटलो असता, त्यांनी अॅरेंजमेन्ट झाली का, असे विचारले असता, त्यांनी मी नाही म्हणून सांगितले. त्यावेळी श्री. उमेश यांनी जेव्हा होईल तेव्हा मला व्हॉटसअपवर फोन कर किंवा अभिला व्हॉटसअपवर फोन कर असे सांगितल्यानंतर मी पुन्हा श्री. अभिजित याना व्हॉटसअपवर कॉल केला असता, उदया तिथला सर्व्हे संपणार आहे असे सांगून कॉल कट केला. माझे व श्री. अभिजीत, उमेश यांचेमध्ये झालेले संभाषण तपासी अधिकारी पो.नि. यशवंत बोरसे यांनी डि.व्ही.आर मशीनव्दारे पंचसमक्ष ऐकूण त्याप्रमाणे पंचनामा केला. त्यानंतर पो.नि. यशवंत बोरसे यांनी मला लाचेच्या रक्कमेची सोय करुन उदया येण्यास सांगितले.

त्यानुसार दुसऱ्या दिवशी दिनांक १४/०२/२०२५ रोजी लाचेच्या रक्कमेची सोय झाल्यानंतर मी पो. नि. यशवंत बोरसे यांना संपर्क केला असता त्यांनी मला दिनांक. १४/०२/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता कलिना पोलीस ट्रेनिंग सेंटर परिसर, कलिना, मुंबई येथे बोलाविल्यानुसार मी हजर झालो. तसेच सदर ठिकाणी शासकीय पंच व सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अमंलदार हे हजर होते. त्यावेळी पो.नि. बोरसे व स.पो.आ माळी यांनी मला श्री. उमेश व अभिजित यांना फोन करून भेटण्याची वेळ घेण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार मी माझ्या मोबाईल फोन क्र.९१३७२२१६६२ वरुन श्री. उमेश यांना त्यांच्या मोबाईल फोन क्र. ८८५०१७९७९१ या संपर्क साधून माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन करुन त्यांना सर्व्हेला आला आहे का असे विचारले असता त्यांनी आम्ही सर्व्हेला आलो आहोत असे सांगितले. त्यावेळी मी उमेश यांना भेटण्यास येतो असे सांगितले.

त्यानंतर मी श्री. उमेश यांना प्रत्यक्ष भेटलो असता, सदर ठिकाणी श्री. अभिजित, ऋषिकेश यांची देखील भेट झाली सदर भेटीच्या दरम्यान झालेले संभाषणामध्ये श्री. उमेश यांनी मला अॅरेंज केले का त्यावेळी मी तेवढं अॅरेंज झाले नाही. तुम्ही वीस सांगितले होते पण तेवढे पण नाही झाले माझ्याकडून असे सांगितले. त्यावर अभिजित याने म्हणाला की, तुम्हाला तीस सांगितलेले. तूम्ही त्यादिवशी केले असते तर वीस मध्ये झालं असतं तुमचं काम. मी त्यांना माझेकडे आता पंधरा हजार अॅडजेस्ट झाले. त्यावर अभिजित यांनी तेवढयात होणार नाही. साहेबाना विचारुन सांगतो. साहेब तर पन्नासच्या खाली येत नाही. कारण पुन्हा मॅप बनवयला लागणार कॅम्प्यूटरवर बसून काम करावे लागणार मॅपमध्ये नाही तर कसं होणार यासाठी ते आतमध्ये घ्यावं लागणार, यासाठी वीस मध्ये नाही होणार तीस करावे लागतील असे सांगितले. यावर त्यांना मी रक्कम कमी करण्याची विनंती केली असता. त्यांनी पंचवीस हजार रुपयांवर फायनल करुया पाचवाजेपर्यत पैसे घेवून ये असे सांगितले. मी त्यांना पैशाची व्यवस्था करुन येतो असे सांगून निघून आलो.

मी व पंच कलिना पोलीस ट्रेनिंग सेंटर परिसर, कलिना, मुंबई येथे परत आलो. सापळा पथकास माहिती दिली. त्यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी झाल्याची खात्री केल्यानंतर पो.नि. यशवंत बोरसे व स.पो.आ माळी, पंच व पोलीस पथकातील अमंलदार आणि मला सापळा कारवाईच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या व लाचेच्या रक्कमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. पो.नि बोरसे यांनी डि. व्ही.आर मशीन चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियानला लावली. त्यानंतर मी, पोलीस पथक व पंच असे कुंचिकुर्वे नगर, साईबाबा मंदिराजवळ, तलाव रोड, कलिना टॅक, कलिना, सांताक्रुझ पूर्व येथे जाण्याकरीता रवाना झालो. त्यांननर मी श्री. विशाल पांडेय, श्री. अभिजीत नागले, श्री. ऋषिकेश चव्हाण यांची भेट घेतली. त्यांनतर माझे खोलीचे सर्व्हे करण्याकरीता श्री. विशाल पांडेय व श्री. ऋषिकेश चव्हाण हे आले व त्यांनी माझे खोलीचे बायोमॅट्रिक सर्व्हे केल्यानंतर माझे खोलीतून श्री. ऋषिकेश चव्हाण हे बाहेर पडले त्यावेळी श्री. विशाल पांडेय यांनी माझेकडे लाचेची रक्कम २५,०००/- रुपये दया असे सांगितल्याने माझेकडे असलेली लाचेची रक्कम श्री. विशाल पांडेय यांच्या हातात दिली. त्यावेळी श्री. पांडेय यांनी मी दिलेली लाचेची रक्कम मोजत असतांना त्यामध्ये चिल्ड्रन बॅकेचे पैसे असल्याची त्यांची खात्री झाल्याने सदरचे पैसे त्यांनी मला परत दिले. त्यानंतर मी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला असता सापळा पथकाने लागलीच श्री. अभिजित, श्री. विशाल पांडेय, श्री. ऋषिकेश चव्हाण यांना ताब्यात घेतले. सदरम्यान माझेकडील लाचेची रक्कम पो.नि.बोरसे यांना देण्यास गेले असता, त्यांनी

(यशवंत बोरसे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

सदरची रक्कम पंच श्री. दाभेकर यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यावेळी मी सदरची रक्कम पंच पंच श्री. दाभेकर यांच्याकडे दिली. सदरवेळी आमचेमधील झालेले संभाषण मला लावण्यात आलेल्या डि.व्ही.आर मधील मायक्रो एस. डी कार्डमध्ये ध्वनीमुद्रित झालेले आहे.

पो.नि. बोरसे यांनी श्री. विशाल पांडेय, श्री. ऋषिकेश चव्हाण, श्री. अभिजीत नागल यांना ताब्यात घेवून प्रथम वाकोला पोलीस ठाणे येथे आलो व वकोला पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण कक्षात माझ्या व त्या तिघांच्या अल्ट्राव्हाईटच्या टयुबलाईटने हाताचे तपासणी केली असता, त्यांच्या व माझ्या हातास अँथ्रासिन पावडरची चकाकी दिसून आली. व त्यानंतर आम्ही सर्वजण पुढील कारवाईकरीता शासकीय वाहनाने ला.प्र.वि, वरळी, मुंबई कार्यालयात आलो. कार्यालयात पो.नि.बोरसे, स.पो.आ माळी व पोलीस पथक व पंच यांनी सविस्तर संभाषणाचे पंचनामे केले.

तरी श्री. विशाल पांडेय, श्री. ऋषिकेश चव्हाण, श्री. अभिजीत नागल, श्री. उमेश यांनी माझेकडे खोलीचे सर्वेक्षण करून बायोमेट्रिक करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडुन मंजुरी घेवुन देण्याकरीता भ्रष्ट मार्गाने आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करून लोकसेवकासाठी माझेकडून गैरफायदयाकरीता रू. ३०,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. २५,०००/- रक्कमेची लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणून माझी सदर खाजगी इसमाविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( यशवंत बोरसे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

Rohit



Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any.

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद फिर्यादी यांच्या आजीच्या नावे असलेल्या खोलीचा समावेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून केलेल्या [illegible]णाच्या सर्वेक्षणात करण्यासाठी यातील कॉलम क्रमांक 7 मधील आरोपी क्र. 2,3 व 4 यांनी फिर्यादी यांच्याकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकरिता रु. 30,000/- रकमेच्या लाचेची मागणी केली तसेच आरोपी अधिकाऱ्यांकरिता रु. 3 क्र. 1 याने तडजोडी अंती रु 25,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद

**केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

6. (1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........

District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant



पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer-in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name श्री यशवंत बोरसे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

Posting मुंबई

Code No. of I. O. ..........

7 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 15/02/2025

1. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner